Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 30/10/2025**

# Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या बातम्या, आतल्या बातम्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

## दिनविशेष

### भारतीय अणुकार्यक्रमाचे जनक डॉ. होमी भाभा



डॉ. होमी जहांगीर भाभा हे भारतीय अणु भौतिकशास्त्रज्ञ होते. त्यांना 'भारतीय अणुकार्यक्रमाचे जनक' म्हणून ओळखले जाते. त्यांचा जन्म ३० ऑक्टोबर १९०९ रोजी मुंबई येथे झाला. त्यांचे प्राथमिक ते पदवीपर्यंतचे शिक्षण मुंबई येथे झाले. होमी भाभा केंब्रिज विद्यापीठातून १९३० साली प्रथम श्रेणीत इंजिनियर झाले. तसेच पॉल डिरॅक यांच्या मार्गदर्शनाखाली गणिताचा अभ्यासही करीत राहिले. कॅव्हेंडिश लॅबोरेटरीत न्यूक्लिअर फिजिक्सचा अभ्यास करून १९३३ मध्ये त्यांनी डॉक्टरेट मिळवली. त्या काळात त्यांना शिष्यवृत्ती आणि अनेक बक्षिसेही मिळाली.

१९४० मध्ये भारतात परत आल्यावर काही काळ त्यांनी भारतीय विज्ञान संस्था, बंगळुरू येथे प्रोफेसर म्हणून काम केले. १९४५ मध्ये टाटा मूलभूत संशोधन संस्थेची स्थापना करण्यात मदत केली आणि आपले संशोधन कार्य संभाळून ते टाटा मूलभूत संशोधन संस्थेचे संचालक झाले. भारताच्या स्वातंत्र्यानंतर १९४८ मध्ये त्यांच्या पुढाकाराने अणुऊर्जा आयोगाची स्थापना करण्यात आली. याही संस्थेचे ते संचालक म्हणून काम पाहू लागले. त्यांच्या अथक परिश्रमांमुळेच भारत देशात अणू भट्टीची स्थापना होऊ शकली. अणूचा वापर शांततेच्या मार्गासाठी व्हावा असे ठाम मत संयुक्त राष्ट्राच्या सभेत मांडणारे डॉ. भाभा हे पहिले वैज्ञानिक होते. डॉ. होमी भाभा यांनी पाया रचला म्हणूनच भारताने अनेक ठिकाणी अणुभट्ट्या सुरू करून त्यांचा वीज निर्मितीसाठी उपयोग केला. तसेच १८ मे १९७४ या दिवशी भारताने पोखरण येथे पहिला अणूस्फोट घडवून आणला. अशा या महान शास्त्रज्ञाचे २४ जानेवारी १९६६ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Oct 30, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHAULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK